पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३०२७, दि.२०/०९/२०१९**
**मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.**

**पोलीसांनी दाखविलेल्या कर्तव्यदक्षतेमुळे तरुणीची हरविलेली बॅग त्यामधील मौल्यवान साहित्य व पासपोर्ट याचेसह मिळाली परत.**

कु.अक्षिता ग्रोवर, रा. गुडगाव, दिल्ली हया झेड एक्स कंपनी, दिल्ली येथे नोकरीस असून, त्या त्यांचे कार्यालयीन कामाकरीता वर्ड ट्रेड सेंन्टर, खराडी येथे आले असता, त्या दि. १९/०९/२०१९ रोजी हॉटेल मेरीएट, मुंढवा, पुणे येथून कॅब मध्ये बसून, विमानगरकडे जात असताना त्यांची बॅग त्याच कॅबमध्ये विसरुन राहिल्याने त्यांनी तात्काळ मुंढवा पोलीस ठाणे येथे येवून त्याबाबत तक्रार दिली व त्यांना सायंकाळी ०५.०० वा दिल्ली येथे जाणेकरीता विमानाचे तिकीट काढण्यात आले असल्याबाबत सांगितल्याने त्यांनी पोलीसांकडे तात्काळ सदरच्या मौल्यवाण वस्तु व पासपोर्ट त्यांना तात्काळ आवश्यक असल्याचे सांगितल्याने पोलीस ठाणेयेथे हजर असलेले सहा. पोलीस निरीक्षक, मनिष पाटील यांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे मुंढवा पोलीस ठाणेचे पोलीस कर्मचारी पोलीस नाईक अमोल चव्हाण यांनी सदर कॅबचालकांचा सी.सी.टी.व्ही. आधारे तात्काळ कॅबचा आर.टी.ओ नंबर प्राप्त करुन व त्यावरुन कॅब चालकाचे नाव, पत्ता व मोबाईल नंबर प्राप्त करता कॅब चालकाचे नाव पोपट लकडे, रा. यवत, दौड येथील असल्याबाबत माहिती प्राप्त झाल्याने नमूद पोलीस कर्मचारी यांनी तात्कळ सदर कॅब चालकास पोलीस ठाणे येथे बोलावून घेवून त्याचे कॅबमध्ये विसरुन राहिलेली बॅग अक्षिता ग्रोवर यांना परत केली. त्याबाबत अक्षिता ग्रोव्हर यांनी महाराष्ट्रामध्ये प्रथम त्यांचेसोबत अशी घडणा घडल्याचे व मुंढवा पोलीस ठाणेकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी दाखविलेल्या कर्तव्य तत्परतेबाबत त्यांनी पोलीसांचे आभार मानले.

तरी नमूद पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चागल्या कामगिरीबद्दल दैनिक वर्तमानत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.